तरुण भारत
Apla Nagpur | 2022-10-15 | Page- 1
epaper.tarunbharat.net

महत्त्वाचे

# आयआयएम आणि भारतीय नौदलात सामंजस्य करार



**नागपूर :** भारतीय नौदलातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या हेतूने आयआयएम नागपूर सोबत सामंजस्य करार केला आहे. यावेळी नौदलाचे कार्मिक प्रमुख व्हाईस ॲडमिरल दिनेश त्रिपाठी व आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी करारावर स्वाक्षरी केली. या करारानुसार नौदलातील अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी आयआयएमतर्फे नव्याने अभ्यासक्रम तयार करण्यात येतील. त्यात बिझनेस मॅनेजमेंट, फायनान्शियल मॅनेजमेंट, ब्लॉकचेन, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डिजिटल मार्केटिंग, सप्लाय चेन आदी विषयांचे पाठ्यक्रम तयार करून त्यात संशोधन करण्याची संधी देखील यात राहणार आहे अशी माहिती डॉ. भीमराया मेत्री यांनी दिली. यासंदर्भात बोलताना दिनेश त्रिपाठी यांनी, आता नाविक दलाच्या अधिकाऱ्यांसाठी ही नवी सोय झाल्याने त्यांचा कौशल्य विकास, या क्षेत्रातील नव्या प्रवाहांची माहिती मिळेल तसेच दोन्ही संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीला बळ मिळेल असा विश्वास व्यक्त केला.